अंतर्गत सुरक्षा व्यवस्था- पोलीस यंत्रणा

१७ मे २०१३

तन्मय कानिटकर

GreenEarth Social Development Consulting Pvt. Ltd.

contactus.greenearth@gmail.com

(शासन व्यवस्थेच्या नीलप्रतीसाठी)

अंतर्गत सुरक्षा व्यवस्था- पोलीस यंत्रणा

अंतर्गत सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा जबाबदार आहेत. वाढती गुन्हेगारी, पोलीस खात्यातील भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, दहशतवाद, नक्षलवाद अशा प्रश्नांत अंतर्गत सुरक्षितता अडकली आहे. महाराष्ट्रातील गुन्ह्यांची संख्या २००६-२०११ या पाच वर्षात जवळ जवळ १८ टक्क्यांनी वाढली आहे.[1] भारताच्या संविधानानुसार अंतर्गत सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा हा संपूर्णपणे राज्य सरकारच्या नियंत्रणातील विषय आहे. राज्याचे गृह खाते अंतर्गत सुरक्षेसाठी जबाबदार असते. महाराष्ट्रातील नागरिकांना अधिकाधिक सुरक्षित वातावरणात जगता यावे, निर्भयपणे जगता यावे यासाठी ठोस पावले उचलणे आवश्यक आहे. पोलीस यंत्रणेत काही महत्वाचे बदल करावे लागतील. सगळ्यात महत्वाचे म्हणजे पोलिसांना सन्मान (dignity) मिळणे आवश्यक आहे. त्याशिवाय पोलीस दलाचे नीतिधैर्य उंचावणार नाही. अद्ययावत पोलीस दल उभारण्यासाठी प्रशिक्षणावर भर द्यावा लागेल. आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी राजकीय हस्तक्षेपांना मर्यादा घालावी लागेल.

पोलीस यंत्रणेचा इतिहास

चीन

प्राचीन चीन मध्ये अतिशय पद्धतशीर पोलीस यंत्रणा अस्तित्वात होती. इ.स.पूर्व १००० सालापासून असलेल्या चू साम्राज्यात याचे संदर्भ सापडतात.[2] प्राचीन चीन मधली ही यंत्रणा साम्राज्याच्या अंतर्गत सुरक्षेसाठी अस्तित्वात होती व ती स्वतंत्र होती. भूभागाचे विशिष्ट आकारात तुकडे पाडले होते. या प्रत्येक भागावर देखरेख करण्यासाठी अधिकारी नेमलेला असे. त्याच्याकडे अंतर्गत सुरक्षा सांभाळण्यासाठी सैनिक असत. चीनच्या पक्क्या नोकरशाहीच्या चौकटीतच या पोलीस यंत्रणेची उभारणी झाली होती. जरी चीनमध्ये पद्धतशीर पोलीस यंत्रणा

[1] http://articles.timesofindia.indiatimes.com/2011-04-07/mumbai/29391816_1_crime-rate-cyber-crime-economic-offences

[2] http://en.wikipedia.org/wiki/Chu_(state)

अस्तित्वात असली तरी, हे पोलीस दल युद्धाच्या वेळी राजाने मागणी केल्यास युद्धासाठी पाठवावे लागे. त्यामुळे पोलीस हे एक प्रकारचे अंतर्गत सुरक्ष सांभाळणारे सैनिकच असत.

युरोप

प्राचीन युरोपात स्वतंत्र पोलीस यंत्रणा अस्तित्वात आली नव्हती. मुख्यतः राजाचे लष्करच अंतर्गत सुरक्षेचे काम बघत असत. रोमन साम्राज्यात अंतर्गत सुरक्षाव्यवस्थेत स्वतंत्र अधिकारी असला तरी त्याच्या हाताखाली लष्कराचीच एक तुकडी दिलेली असे. त्यामुळे या विभागाकडे लष्कराचेच एक काम या दृष्टीने बघितले जाई.

बाराव्या शतकात स्पेनमध्ये 'ब्रदरहूड' नावाने काही ठिकाणी अंतर्गत सुरक्षा उभारण्यात आली होती. संघटीत गुंडगिरी आणि लूटमार करणाऱ्या टोळ्या यापासून संरक्षण करण्यासाठी स्थानिक पातळीवर उभारलेले सैन्य म्हणजे हे ब्रदरहूड. पण तात्पुरती गरज भागल्यावर नंतर एक व्यवस्था म्हणून ही पद्धत उदयाला येऊ शकली नाही. पंधराव्या शतकातील फर्डिनांड आणि इसाबेला या स्पेनमधील वेगवेगळ्या छोट्या राज्यांना एकत्र करून मोठे एकसंध 'स्पेन' हे राज्य निर्माण केले. राजा-राणीने 'होली ब्रदरहूड' ची स्थापना केली होती. या ब्रदरहूड च्या सैनिकांच्या तुकड्या जवळ जवळ १८३५ पर्यंत अंतर्गत सुरक्षेसाठी पोलीस म्हणून कार्यरत होत्या.[3]

आजच्या आधुनिक पोलीस दलाशी साधर्म्य असणारे पोलीस दल फ्रान्स मध्ये उभारण्यात आले होते. फ्रान्सचा राजा चौदावा लुई याने १६६७ मध्ये त्यावेळच्या युरोपातील सर्वात मोठ्या शहरासाठी- पैरीससाठी स्वतंत्र पोलीस यंत्रणा उभारली. या पोलीस यंत्रणेचा एक प्रमुख होता. शहराचे एकूण १६ विभाग पाडण्यात आले होते. आणि त्या प्रत्येक विभागासाठी एकेक कमिशनर नेमण्यात आला होता. या कमिशनरांच्या हाताखाली प्रचंड मोठी नोकरशाही उभारण्यात आली. शहराच्या पोलीस प्रमुखाला मदतीसाठी ४४ कमिशनर नेमण्यात आले होते. १६९९ पासून पैरीस मध्ये यशस्वी झालेली ही योजना फ्रान्समधील सर्वच शहरात राबवण्यात आली. पुढे फ्रेंच राज्यक्रांतीनंतर आणि नेपोलिअन बोनापार्टच्या साम्राज्यात या रचनेत बरेच बदल झाले. आजच्या

[3] http://en.wikipedia.org/wiki/Police#European_development

फ्रान्समधील पोलीस दलाची स्थापना १८०० मध्ये झाली. याच पोलीस दलाने १८२९ मध्ये जगात प्रथमच पोलिसांना स्वतंत्र गणवेश दिले. हे जगातले पहिले गणवेशधारी पोलीस दल.[4]

स्कॉटलंडच्या एडींगबर्ग शहराची स्वतःची पोलीस यंत्रणा १६८२ साली उभारण्यात आली होती. एडींगबर्ग टाऊन गार्ड्स असे त्यांना म्हणले जात असे. इंग्लंडमध्ये मात्र सर्व प्रथम लंडन शहरात 'हेन्री फिल्डिंग' नावाच्या एका लेखकाने पोलीस यंत्रणेचा पाया घातला. बो स्ट्रीट रनर्स असे त्यांना म्हणले जायचे. अगदी सुरुवातीला अवघी ६ अशी संख्या असलेल्या या यंत्रणेचा आकार वाढत गेला. या यंत्रणेचे वैशिष्ट्य म्हणजे ही केवळ अतर्गत सुरक्षा-शांततेसाठी असणारे सैन्य नव्हते तर आधुनिक न्यायव्यवस्थेतील वॉरंट बजावणे, गुन्ह्याबद्दल अटक करणे, न्यायालयात सरकार तर्फे आरोपपत्र दाखल करणे इत्यादी गोष्टींची सुरुवात बो स्ट्रीट रनर्स या यंत्रणेने केली. मुख्य कार्यालय हेन्री फिल्डिंगच्या घरातच बो स्ट्रीट वर होते म्हणून या गटाचे नाव बो स्ट्रीट रनर्स असे पडले. या यंत्रणेला केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध होऊ लागला. कामाचे स्वरूप आणि सरकारतर्फे स्वतंत्र आर्थिक तरतूद अशा गोष्टींमुळे आधुनिक पोलीस यंत्रणेचा पाया घातला गेला.

भारत

अंतर्गत सुरक्षेच्या बाबतीत भारतातील यंत्रणा ही जगातील इतर व्यवस्थांच्या तुलनेत अधिक विकेंद्रित होती. गावाचा पाटील किंवा मुखिया(सरपंच) हा मुख्यत्वे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत जबाबदार असे. त्याच्याकडे स्वतःचे राखीव सैन्य असे. गावाच्या आकारावरून सैनिकांची संख्या ठरे. अनेक राजे आपल्या सरदारांना जहागिरी बहाल करत. या जहागीरीतील अंतर्गत सुरक्षेची जबाबदारी ही त्या त्या जहागीरदारावर येऊन पडत असे. तो आपल्या सोयीनुसार पाटील वगैरेंची नेमणूक करून व्यवस्था बघत असे.[5]

पेशवाईमध्ये पुण्यासारख्या नगरासाठी 'कोतवाल' नावाचा अधिकारी नेमण्यात येत असे. नगरात चौक्या उभारून शांतता आणि सुरक्षितता जपणे, गुन्हेगारांना अटक करणे, अशी कामे हा

[4] http://web.archive.org/web/20080506215949/http://www.prefecture-police-paris.interieur.gouv.fr/documentation/bicentenaire/theme_expo4.htm

[5] 'Ancient India' : R.C.Majumdar

कोतवाल करत असे. कोतवालाकडे स्वतःचा फौजफाटा असे. नगरांमध्ये कोतवाली असली तरी गावांमध्ये पाटील-सरपंच हीच व्यवस्था होती.[6]

आधुनिक भारतातील पोलीस यंत्रणा ही ब्रिटिशांनी उभारलेल्या यंत्रणेवरच आधारलेली आहे. भारतातील आधुनिक नोकरशाहीची रचना ब्रिटिशांनी ज्याप्रमाणे आपले साम्राज्य सुरक्षित राहावे या उद्देशाने केली होती त्याचप्रमाणे पोलीस यंत्रणाही आपले साम्राज्य बळकट करण्यासाठी उभारण्यात आली होती. साधारण तशीच बहुतांश रचना (हुद्दे, पदे इ.) स्वातंत्र्यानंतर भारताने स्वीकारली जी आजही अस्तित्वात आहे.

पोलीस यंत्रणा (सद्यस्थितीतील प्रश्न आणि उपाय)

पोलिसांचे संख्याबळ

सद्यस्थिती-

पोलिसांचे संख्याबळ किती असावे असा काही ठराविक नियम नाही. दर एक लाख नागरिकांमागे किमान २२२ पोलीस असावेत असे मानक संयुक्त राष्ट्रसंघाने दिले आहे. भारतात ही संख्या १३०[7] आहे.

पुढील तत्क्ता पहा-

देशाचे नाव	पोलिसांची संख्या (दर १ लाख लोकसंख्येमागे)[8]	गुन्हेगारी निर्देशांक (क्राईम इंडेक्स)[9]
भारत	१३०	४२.१२
ब्राझील	२८२	६२.६२
रशिया	५४६	५२.३९
अमेरिका	२५६	५३.४४

[6] 'पुण्याचे पेशवे' : अ.रा. कुलकर्णी., राजहंस प्रकाशन.

[7] http://news.rediff.com/interview/2010/feb/15/number-of-policemen-per-100000-people-in-india-is-130.htm

[8] https://en.wikipedia.org/wiki/List_of_countries_by_number_of_police_officers

[9] http://www.numbeo.com/crime/rankings_by_country.jsp

लोकसंख्या, देशाचा आकार आणि लोकशाही यंत्रणा या गोष्टी विचारात घेऊन तुलनेसाठी हे चार देश बघितले. या तक्त्यातून पोलीस संख्या आणि गुन्ह्यांची संख्या यांचा फारसा संबंध नाही असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो.

परंतु भारतातील परिस्थिती विचारात घेता संपूर्ण देश म्हणून न बघता राज्याच्या पोलीस दलांकडे स्वतंत्रपणे बघणे अधिक संयुक्तिक ठरेल. कारण अंतर्गत सुरक्षा आणि पोलीस दल हा राज्यांच्या अखत्यारीतला विषय आहे.

पुढील तक्ता पहा-

देशाचे नाव	पोलिसांची संख्या (दर १ लाख लोकसंख्येमागे)	गुन्हेगारी निर्देशांक (क्राईम इंडेक्स)
जर्मनी	२९८	२३.८६
स्पेन	५११	३४.१२
कॅनडा	२०२	३४.९८
बांगलादेश	८३	५९.४३

या तक्त्यातील देशांचा/लोकसंख्येचा आकार कमी आहे. या तक्त्यातील देशांत पोलिसांची संख्या जास्त असल्यास गुन्हेगारी निर्देशांकामध्ये फरक पडलेला दिसून येतो.

या तक्त्यातील देशांशी महाराष्ट्राची तुलना करता येऊ शकेल. महाराष्ट्रातील पोलिसांची दर १ लाख लोकसंख्येमागे पोलिसांची संख्या आहे १६३[10]. ही संख्या राष्ट्रीय सरासरी पेक्षा जास्त असली तरी संयुक्त राष्ट्रसंघाने मानक म्हणून ठरवलेल्या २२० या संख्येपेक्षाही तब्बल ५७ ने कमी आहे. म्हणजे जवळ जवळ २५ टक्क्यांनी कमी. हा आकडा मोठा आहे.

उपाय-

[10] महाराष्ट्रातील पोलिसांची साधारण संख्या १,८०,००० आहे. आणि लोकसंख्या ११ कोटी.

महाराष्ट्रात पोलिसांची संख्या वाढवणे अत्यावश्यक आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानकांनुसार दर एक लाख लोकसंख्येमागे किमान २२० पोलीस महाराष्ट्रात असावेत.

रिक्त जागा भरणे- याशिवाय पोलीस दलातील मंजूर जागाही अनेकदा रिक्त असतात. विशेषतः अधिकारी वर्गातील. या जागांची भरती होणे आवश्यक आहे. अधिकारी वर्ग हा निर्णय प्रक्रियेतील भाग असतो. साहजिकच गुन्ह्यांचा तपास करणे, आरोपपत्र दाखल करणे अशा महत्वपूर्ण गोष्टींमध्ये मनुष्यबळाची कमतरता पोलीस दलाला जाणवते. त्यामुळे एकूण पोलिसांची संख्या केवळ कागदावर मंजूर करण्याबरोबरच रिक्त जागा भरणे हे महत्वाचे आहे.

पोलिस दलाचे विभाग

सद्यस्थिती-

पोलीस दलाचे वेगवेगळे विभाग असतात. उदा. गुन्हे अन्वेषण विभाग, अंमलीपदार्थ विरोधी पथक, दहशतवादविरोधी पथक, बॉम्ब शोधक व नाशक पथक, वाहतूक विभाग इ.

मात्र पोलिसांची नेमणूक करताना अथवा बदल्या करताना सर्व पोलीस दलाला एकच मानले जाते. यामुळे आज वाहतूक विभागात असणारा अधिकारी उद्या बदली होऊन अंमलीपदार्थ विरोधी पथकात जाऊ शकतो. सर्वसाधारणपणे एक अधिकारी एका पदावर ३ वर्षासाठी असतो. त्यानंतर त्याची बदली होते. मात्र सर्वस्वी नवीन विभागात गेल्यावर संबंधित अधिकाऱ्याला त्या त्या विभागातले सर्व प्रश्न आणि इतर स्थानिक गोष्टी समजून घेण्यातच एक-दोन वर्ष निघून जातात आणि प्रत्यक्ष काम करायला फारच थोडा अवधी मिळतो.[11]

उपाय-

[11] जानेवारी २०११ मध्ये सिंहगड कॉलेज येथे बोलताना पुण्याचे तत्कालीन वाहतूक पोलीस उपायुक्त मनोज पाटील यांनी सांगितले, "मी मुळातला पुण्याचा नाही. वाहतूक विभागात उपायुक्त म्हणून नेमणूक झाल्यावर पहिले एक सव्वा वर्ष माझे पुणे, इथली वाहतूक, लोकांची मानसिकता समजण्यात गेला. आणि त्याचबरोबर वाहतूक विषयात समस्या सोडवण्याचे मला आकलन नव्हते आणि अजूनही आहे असे वाटत नाही. मी समजून घेतो आहे शिकतो आहे. पण हे पूर्ण होण्या आधीच कार्यकाल संपल्यामुळे माझी बदली होईलच. साहजिकच चौकटीबाहेरचे उपक्रम हाती घेणे आणि ते राबवणे यासाठी अधिकाऱ्यांमध्ये उत्साह उरतोच असे नाही."

उपायांमध्ये पुढीलप्रमाणे दोन भाग सुचवावेसे वाटतात.

भाग १) पोलीस भरती करताना पोलिसांची थेट वेगवेगळ्या विभागांत भरती करण्यात यावी. आणि एकदा एका विभागात नेमल्या गेलेल्या पोलिसाची दुसऱ्या विभागात बदली करण्यात येऊ नये. तशाच पद्धतीने विभागवार प्रशिक्षण देता येऊ शकेल. आपल्या विभागाचा अधिक अनुभव असलेले पोलीस अधिक कार्यक्षम होतील. सर्वांना सर्वच यायला हवे असे न राहता पोलीस दलातही विषयानुरूप 'स्पेशालिस्ट' तयार होतील यामुळे पोलीस दलाचे कामकाज अधिक प्रभावी होईल.

भाग २) गुन्ह्यांचा तपास करणे, गुन्हेगारांना अटक करणे, गस्त घालणे ही पोलिसांची नित्य कामे आणि आरोपपत्र दाखल करणे, गुन्ह्यांची नोंद ठेवणे, पत्रव्यवहार करणे, पासपोर्टसाठी कागदपत्रांची छाननी करणे अशी कामे विभागण्यात यावी. दुसऱ्या प्रकारची कामे ही कारकुनी स्वरुपाची किंवा कार्यालयात बसून करायची आहेत. या प्रकारच्या कामासाठी स्वतंत्र तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. विशेषतः कायदा आणि संख्याशास्त्र (stastistics) संदर्भात.[12]

आरोपपत्र दाखल करताना चुका झाल्याने न्यायालयात गुन्हेगार सुटण्याच्या घटना घडतात. आरोप निश्चिती करताना लावायची कलमे, आरोपपत्र मुद्देसूद मांडणे यासाठी पोलिसांना आवश्यक वाटल्यास कायदेशीर मदत घेता येते पण त्यामध्ये वेळ जात असल्याने पोलीस हे काम स्वतःच करतात. आणि मग त्रुटी राहण्याची शक्यता बळावते.[13] म्हणून पोलीस स्टेशन मधेच विभागवार आवश्यक ते तज्ञ मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे. यामुळे पोलीस त्यांच्या मुख्य कामाकडे म्हणजे गुन्ह्यांचा तपास करणे, सुरक्षा बंदोबस्त, गस्त घालणे इत्यादीवर अधिक लक्ष केंद्रित करू शकतील आणि कार्यक्षमता वाढेल.

पोलिसांचे प्रशिक्षण

सद्यस्थिती-

महाराष्ट्रात १० पोलीस प्रशिक्षण केंद्रे आहेत. यापैकी नाशिक येथे 'महाराष्ट्र पोलीस अकादमी' हे सर्वात महत्वाचे केंद्र आहे. बाकीची केंद्रे नागपूर, सोलापूर, अकोला, जालना, दौंड,

[12] न्यूयॉर्क पोलीस दलात वेगवेगळे विभाग अस्तित्वात आहेत. ज्याचा उत्तम फायदा त्यांना त्यांच्या कामात होतो. http://www.nyc.gov/html/nypd/html/administration/administration.shtml

[13] माजी पोलीस अधिकारी सुरेश खोपडे यांच्याशी झालेल्या चर्चेतून.

खंडाळा, मुंबई, लातूर येथे आहेत. तर नाशिक येथेच एक तपासकामाचे स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र (Detective Training School) आहे.[14] यापैकी नाशिक येथील केंद्र त्यातल्या त्यात अद्ययावत आहे. सदर केंद्र १९०६ मध्ये पुण्यात सुरु झाले. पण नाशिकमध्ये सर्व बांधकाम आणि इतर सोयीसुविधा बांधून झाल्यावर या केंद्राचे पुण्याहून स्थलांतर करण्यात आले.[15]

'महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक' येथे फक्त इन्स्पेक्टर, सबइन्स्पेक्टर आणि डेप्युटी सुपरिटेंडन्ट या पदासाठी भरती होणाऱ्यांचे प्रशिक्षण होते. इतर हुद्द्यांवरील (कॉन्स्टेबल, हेड कॉन्स्टेबल) पोलिसांसाठी इतर केंद्रांचा वापर होतो. केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन IPS अधिकारी होणाऱ्यांचे प्रशिक्षण आयोगाच्या मसुरीच्या अकादमी मध्ये होते.

महाराष्ट्रात पोलिसांचे प्रशिक्षण हा अतिशय महत्वाचा असूनही दुर्लक्षिलेला विषय आहे. याची मुख्य कारणे दोन[16]-

एक- पोलीस एकदा प्रशिक्षण घेऊन सेवेत दाखल झाला की त्याला पुन्हा प्रशिक्षण दिले जात नाही. अधून मधून पोलिसांची विषयानुरूप प्रशिक्षणे घेतली जातात. पण ती अतिशय त्रोटक आणि अपुरी असतात. त्यामध्ये पोलिसांना सर्व बाजूंनी अद्ययावत आणि नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी सज्ज करण्यापेक्षा तात्पुरत्या प्रश्नांवर प्रतिक्रिया (Response) कशी द्यावी यावर भर असतो. साहजिकच गुन्हेगार अद्ययावत होत असताना पोलीस यंत्रणा मात्र दोन पावले मागेच राहते.[17]

---

[14] http://www.mahapolice.gov.in/mahapolice/jsp/temp/rpts.jsp

[15] http://mahapolice.gov.in/mahapolice/jsp/temp/html/mpa.pdf

[16] बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे (BDDS) माजी प्रमुख श्री. जगदाळे यांच्याशी झालेल्या चर्चेतून. BDDS मध्ये नेहमीच प्रशिक्षित कर्मचारी-अधिकाऱ्यांची कमतरता जाणवते. उपलब्ध कर्मचाऱ्यांची या विषयातली माहिती व प्रशिक्षण अद्ययावत केले जात नाही. श्री जगदाळे हे BDDS चे प्रमुख असल्याने त्यांच्या या मताला महत्व द्यावे.

[17] उदा. बॉम्ब शोधक व नाशक पथकात असलेल्या कर्मचाऱ्यांना पारंपारिक पद्धतीचे बॉम्ब फुटण्यापासून (Defuse) रोखता येतात. मात्र अगदी अद्ययावत पद्धतीने बॉम्ब तयार केले गेले तर ते फुटण्यापासून कसे रोखावेत याचे प्रशिक्षण या पथकास नाही. नवीन तंत्रामध्ये एकच सर्किट न ठेवता अनेक सर्किट्सचा बॉम्ब बनवण्यात येतो. त्यामुळे तो एखादेच सर्किट तोडून बॉम्ब फुटणे थांबवता येत नाही. सध्या असा बॉम्ब सापडल्यास तो एखाद्या सुरक्षित स्थळी नेऊन फोडण्याशिवाय पर्याय नाही. पण ही प्रक्रिया अत्यंत धोकादायक आहे.

दोन- अपुऱ्या मनुष्यबळामुळे अतिरिक्त पडणाऱ्या कामातून प्रशिक्षण आणि नियमित कसरत करणे या गोष्टींसाठी पोलिसांना वेळच मिळत नाही. साहजिकच शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्तीकडे दुर्लक्ष होते.

CAG ने १६ मार्च २०१० रोजी हरियाणा विधानसभेत मांडलेल्या अहवालानुसार २००४ ते २००९ दरम्यान हरियाणा सरकारने पोलिसांच्या आधुनिकीकरण करण्यासाठी रु. १६४.२४ कोटी खर्च केले. ३.६६ कोटी रुपये आधुनिक शस्त्र खरेदीसाठी खर्च केले. परंतु ७८% पोलिसांना आधुनिक तंत्रज्ञान आणि शस्त्र वापर यासाठी प्रशिक्षणच देण्यात आलेले नाही.[18]

उपाय-

प्रथम अस्तित्वात असलेली सर्व प्रशिक्षण केंद्रे अद्ययावत करणे आवश्यक आहे. प्रशिक्षण केंद्रे ही केवळ भरतीच्या वेळी प्रशिक्षण द्यायची केंद्रे न बनता पोलिसांना अद्ययावत बनवायची केंद्रे बनली पाहिजेत. पोलीस प्रशिक्षण केंद्रे ही पोलिसांसाठी मदत केंद्रेही बनली पाहिजेत.

या प्रशिक्षण केंद्रात सर्व पोलिसांसाठी पुढील विषयांवर मुख्यत्वे लक्ष दिले जावे-

१) शारीरिक तंदुरुस्ती.
२) मानसिक स्वास्थ्य
३) शस्त्र हाताळणी
४) संगणक आणि इतर माहिती प्रसार माध्यमांची हाताळणी. (स्मार्ट फोन्स इ.)
५) संभाषण कौशल्ये
६) नेतृत्व कौशल्ये.
७) कायदे- अधिकार, कर्तव्ये, जबाबदाऱ्या आणि महत्वाचे म्हणजे हक्क.

याशिवाय विशिष्ट विभागातल्या पोलिसांना स्वतंत्रपणे प्रशिक्षणाची आवश्यकता असेल. उदा. अंमलीपदार्थ विरोधी पथकातील हवालदारापासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांना विशेष प्रशिक्षण

[18] Indian Police Journal, Jan-Mar 2013, http://bprd.nic.in/showfile.asp?lid=1093

द्यावे लागेल. वेगवेगळे अंमलीपदार्थ, त्यांची माहिती त्यांचे परिणाम, अशा पदार्थांचे सेवन केलेल्यांवर होणारे परिणाम, जीवशास्त्रीय दृष्टीकोनातून त्यांची इत्थंभूत माहिती इ.

हेच वाहतूक विभागासारख्या महत्वाच्या विभागाला लागू होते. वाहतूक नियोजन आणि नियंत्रण याविषयीचे सखोल ज्ञान प्रशिक्षणाद्वारे त्या त्या विभागातील अधिकाऱ्यांना देण्याची गरज आहे जे अद्ययावत प्रशिक्षण केंद्रातून केले जावे.

प्रशिक्षण उपकेंद्रे- प्रशिक्षण केंद्रे राज्यात दहाच ठिकाणी आहेत. पण महाराष्ट्रात एकूण दहा पोलीस आयुक्तालये आणि ३५ जिल्हा पोलीस मुख्यालये आहेत.[19] या सर्व ४५ ठिकाणी लहान आकाराची का होईना पण अद्ययावत प्रशिक्षण केंद्रे असणे आवश्यक आहे. ही केंद्रे मुख्य दहापैकी कोणत्या न कोणत्या केंद्राशी संलग्न करता येऊ शकतात. यामुळे मुख्य दहा केंद्रे आणि इतर ४५ उपकेंद्रे अशी पोलीस प्रशिक्षणाची व्यवस्था उभारण्यात यावी.

परीक्षा- सर्व पोलिसांना दर चार वर्षातून एकदा सर्व वरती दिलेल्या प्रशिक्षणाच्या विषयांच्या परीक्षा देणे बंधनकारक करावे. त्यासाठी या सर्व परीक्षा केंद्रांनी वर्षातून किमान दोन वेळा परीक्षांचे आयोजन करावे. शारीरिक तंदुरुस्ती वगळता इतर परीक्षा ऑनलाईन घ्याव्यात. म्हणजे पोलीस असतील तिथून या परीक्षा देऊ शकतील. या परीक्षेत नापास होणाऱ्या पोलिसांना बढती देऊ नये.

पोलिसांची गुणवत्ता वाढवणे हे या प्रशिक्षण केंद्रांचे मुख्य ध्येय असेल.

पोलीस आणि माहिती तंत्रज्ञान

सद्यस्थिती-

माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने क्रांती घडत आहे. भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांपैकी तब्बल ५०% लोक हे महाराष्ट्रात आहेत.[20] जवळ जवळ ७ कोटी महाराष्ट्रीय नागरिक इंटरनेट वापरतात. सायबर क्राईम क्षेत्रातही महाराष्ट्र पुढे आहे. असे असूनही महाराष्ट्र पोलीस मात्र माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात मागे आहेत. अजूनही सर्व पोलीस चौक्या इंटरनेटने जोडल्या गेलेल्या

[19] http://www.mahapolice.gov.in/

[20] Wikipedia- http://en.wikipedia.org/wiki/Maharashtra

नाहीत. तक्रारी दाखल झाल्यावर त्याचे ताबडतोब संगणकीकरण होत नाही. या तक्रारींचे स्टेटस ऑनलाईन बघता येऊ शकत नाही. घरबसल्या तक्रारी दाखलही करता येत नाहीत. पोलिसांचे कामकाज अजूनही फाइल्स मधेच अडकलेले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत नाही.

उपाय-

पोलीस दलाची संकेतस्थळे (प्रत्येक आयुक्तालयाचे आणि जिल्हा मुख्यालयाचे एकेक) अधिकाधिक लोकाभिमुख करण्याची आवश्यकता आहे. घरबसल्या त्यावर तक्रार दाखल करण्याची सोय असावी. सर्व पोलीस चौक्या इंटरनेटने जोडण्यात याव्यात. समक्ष आलेल्या सर्व तक्रारींचे २४ तासांच्या आत संगणकीकरण व्हावे. त्याचे स्टेटस नागरिकांना संकेतस्थळावर तक्रार नंबर घातल्यावर बघता यावे. त्यामध्ये तपास करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव, हुद्दा व मोबाईल नंबर असावा.

नवीन स्मार्ट फोन्स सारख्या उपकरणांसाठी आवश्यक प्रणाली (applications) बनवून घ्याव्यात. त्यामार्फत अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोहचण्याचा प्रयत्न करावा.

नागरिकांना पोलीस आपले वाटले पाहिजेत यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर शहरी भागात तरी प्रभावी ठरेल. त्याचबरोबर अंतर्गत नियोजनासाठीही संपूर्ण संगणकीकरण उपयुक्त ठरेल. विशेषतः दंगली, नैसर्गिक आपत्ती, दहशतवादी हल्ला अशा आणीबाणीच्या प्रसंगांमध्ये सुसूत्र पद्धतीने हालचाली करण्यासाठी पोलिसांना या आधुनिक तंराज्ञानाचा मोठा फायदा होईल.

आधुनिक शस्त्रे व उपकरणे

सद्यस्थिती-

२६/११ च्या मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पोलीस दलाकडे आधुनिक शास्त्रे देण्याची घोषणा जरी सरकारने केली असली तरी प्रत्यक्षात त्याची पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही. २६/११ हल्ल्याच्या वेळी दहशतवाद्यांकडच्या एके ५६ सारख्या रायफल्सना मुंबई पोलिसांनी .३०३ रायफल्सने तोंड दिले होते. या रायफल्स १८८९ ते १९५० पर्यंत वापरल्या जात.[21]

21 http://www.accuratepowder.com/data/PerCaliber2Guide/Rifle/Standarddata(Rifle)/311Cal(7.90mm)/303%20British%20pages%20282%20and%20283.pdf

त्याचबरोबर पोलिसांकडे होत्या ०.३८ बोअर पिस्तुली. या पिस्तुली १९२७ साली वापरल्या जात. हे लक्षात घेतल्यास मुंबई पोलिसांचे शस्त्रास्त्रांच्या बाबतीतले मागासलेपण लक्षात यावे.

उपाय-

२६/११ च्या या हल्ल्यानंतर गृहमंत्रालयाने आधुनिक ग्लॉक बंदुका आणि MP5 सबमशीनगन्स मंजूर केल्या आहेत. मात्र अद्याप त्या पोलिसांच्या हातात पोहचलेल्या नाहीत. या नवीन बंदुका आधुनिक असल्या तरी अत्याधुनिक मानता येत नाहीत. ग्लॉक बंदुका १९६३ सालच्या तर MP5 सबमशीनगन्स १९६६ सालच्या मॉडेलच्या आहेत. शास्त्रास्त्रांमध्ये नवनवीन तंत्रज्ञान येत आहे.[22] त्याचा वापर पोलीस दलाने वापरायच्या बंदुकांमाधेही दिसून यायला हवा. विशेषतः दहशतवादी अत्याधुनिक अस्त्रांचा वापर करत असताना त्यांना तोंड देण्यासाठी हे करणे आवश्यक आहे.

यासाठी तज्ञांची स्वतंत्र यंत्रणा हवी जी याबाबत अभ्यास करेल आणि गृह खात्याला सूचना करेल.

राजकीय यंत्रणेचा हस्तक्षेप

सद्यस्थिती-

पत्रकारांपासून ते माजी पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत आणि सनदी अधिकाऱ्यांपासून ते पोलीस खात्यातील कारकुनापर्यंत ज्यांच्याशी पोलीस खात्यातील प्रश्न हा विषय हा काढला त्यापैकी प्रत्येकाने राजकीय हस्तक्षेप हा सर्वात मोठा प्रश्न असल्याचे सांगितले. बदली करणे, बढत्या रोखणे, अपमानास्पद वागणूक देणे, आर्थिक लाभ रोखणे, अतिरिक्त काम देणे अशा विविध मार्गांनी धाक दाखवत राजकीय नेते पोलीस दलावर अंकुश ठेवतात.

[22] न्यूयॉर्क पोलीस १९९७च्या काहर के९ या वजनाने छोट्या आणि अधिक चांगला नेम असणाऱ्या पिस्तुली वापरतात. याही आता कालबाह्य झाल्या म्हणून बदलण्याचा न्यूयॉर्क पोलिसांचा विचार आहे. http://www.nydailynews.com/news/crime/nypd-brass-cops-stop-kahr-k-9-semi-automatic-pistol-off-duty-gun-article-1.990037

राजकीय नेत्यांच्या अदेशामुळे एखाद्या प्रकरणाचा योग्य तपास न करणे, अर्धवट व अपुरे आरोपपत्र दाखल करणे, सर्व उपलब्ध पुरावे कोर्टासमोर सादर न करणे अशा विविध मार्गांनी पोलीस राजकीय नेत्यांना, नाईलाजाने किंवा स्वखुशीने, मदत करत असतात. मोठ्या गुन्ह्यांपासून ते अगदी 'बंद' विषयी फेसबुकवर लिहिणाऱ्या पालघरच्या 'शाहीन धडा'ला स्थानिक शिवसेना नेत्याच्या दडपणाखाली अटक करणे असो, राजकीय नेते पोलिसांना स्वायत्तता देत नाहीत. राजकारणात आलेली गुंड मंडळी, आणि गुंड मंडळींना अभय देणारे राजकारणी यांच्यामुळे पोलिसांच्या नीतीधैर्यावर मोठा परिणाम होतो. पोलीस संघटीत गुन्हेगारीविरुद्ध बिनधास्त आणि ठोस कारवाई करायला कचरतात. यामुळे असंख्य बेकायदेशीर उद्योगांना संरक्षण मिळतं. याचा विपरीत परिणाम राष्ट्रीय सुरक्षेवर होतो. १९९३ च्या मुंबई स्फोटांच्या वेळी स्फोटके मुंबईत आणण्यासाठी जो समुद्री मार्ग वापरला गेला तो त्या आधी अनेक वर्षे स्मगलिंग साठी वापरला जात असे. आणि हे माहित असूनही पोलिसांनी याकडे दुर्लक्ष केले होते.[23]

नक्षलवाद्यांना वैद्यकीय आणि इतर साहित्य पुरवण्यात सहभागी असलेल्या काहींविरोधात पोलिसांनी अटकेची कारवाई केल्यावर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्वेसर्वा असलेल्या नेत्याचा थेट पोलीस महासंचालक सुभाष मल्होत्रा यांना त्या व्यक्तींना त्रास देऊ नका असे बजावणारा फोन गेला. हाच निरोप तेव्हाचे पोलिस अधीक्षक राजवर्धन यांच्यापर्यंत पोचवण्यात आला. आणि मग संबंधित गुन्हेगारांना 'पोटा' कायद्याखाली अटक करण्याचा विचार पोलिसांना सोडून द्यावा लागला. अशा अनेक घटना घडल्यामुळे नक्षलवादग्रस्त भागातील पोलीस आता कोणाही विरुद्ध ठोस कारवाई करणे टाळतात.[24]

उपाय-

पोलीस यंत्रणेत राजकीय हस्तक्षेप कमी करण्यासाठी तीन महत्वपूर्ण सूचना आहेत-

<u>एक-</u> बढत्या आणि बदल्या कोणी व कोणत्या परिस्थितीत कराव्यात याचे नेमके नियम करण्यात यावेत. त्यांचे काटेकोरपणे पालन केले जावे.

<u>दोन-</u> पोलिसांसाठी स्वतंत्र पोलीस न्यायालय (tribunal) असावे. पोलिसांच्या सर्व प्रकारच्या

[23] Black Friday : Hussain Zaidi, Penguin Publication. 2002.

[24] नक्षलवादाचे आव्हान : देवेंद्र गावंडे, साधना प्रकाशन. पान ६४.

तक्रारींचे निराकरण करण्याचे अधिकार या न्यायालयास असावेत. या न्यायालयाच्या विरोधात हायकोर्टात अपील करण्याची मुभा असावी. सदर न्यायालयात जाणाऱ्या व्यक्तीस, कायदेशीर संरक्षण मिळावे. (whistelblower's protection)

तीन- गृहखात्याच्या नेमणुका, बदल्या व इतर सर्वच महत्वपूर्ण निर्णयांमध्ये अधिकाधिक पारदर्शकता असावी.

पोलिसांसाठी सोयी सुविधा, पगार

सद्यस्थिती-

सहाव्या वेतन आयोगामुळे गेल्या काही वर्षांत पोलिसांच्या वेतनात वाढ झाली आहे. मुख्य वेतन आणि भत्ते यांसह अगदी नव्याने रुजू होणाऱ्या हवालदाराला मिळणारा पगार आता सुमारे २०,००० झाला आहे.[25] शहरातील पोलिसांची नेमणूक शहरातच होत असल्याने सर्वांसाठी घरे नसतात. बाहेरून नेमल्या जाणाऱ्या पोलिसांना महाराष्ट्र स्टेट पोलीस हौसिंग कॉर्पोरेशन तर्फे प्रत्येकी अवघे २२० स्क्वे. फुटांचे घर दिले जाते. आठ तासांची ड्युटी असली तरी बहुतेक वेळा जास्त वेळ काम करावे लागते. या जास्तीच्या कामाचा भत्ता अत्यल्प आहे.

पोलिसांची संख्या कमी असल्याने उपलब्ध पोलिसांवर कामाचा प्रचंड ताण येतो. त्यात वरिष्ठांचा आणि राजकीय नेत्यांचा दबाव असतो. आणि हे सगळे असतानाही नागरिकांकडून पाठींबा न मिळणे, सतत टीका होणे यामुळे पोलिसाचे नीतिधैर्य पार खचते. यातून व्यसनाधीनता आणि मानसिक स्वास्थ्याच्या तक्रारी सुरु होतात.[26]

उपाय-

उपाय-

पोलिसांना आपली नोकरी सुखावह वाटली पाहिजे आणि त्यासाठी पुढीलप्रमाणे विशेष उपाय योजना कराव्या लागतील-

[25] पोलीस खात्यात काम करणाऱ्या सुचित्रा पुरंदरे आणि श्रीमती शिल्पा कोलते यांच्याशी झालेल्या चर्चेतून.

[26] प्रफुल्ला मोहिते, समुपदेशक- मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र, यांच्याशी झालेल्या चर्चेतून.

१) पोलिसांना जास्तीच्या कामाचा (overtime) भत्ता वाढवून देण्यात यावा. शिवाय एकाच पोलिसाला जास्तीचे काम महिन्यातून कितीवेळा द्यावे यावर बंधन असावे.

२) सैनिकांना ज्याप्रमाणे विविध करांमध्ये सवलत असते त्याप्रमाणे ती पोलिसांनाही द्यावी.

३) पोलिसांच्या मुलांना महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण सवलतीच्या दरात उपलब्ध व्हावे.

४) विशेष काम करणाऱ्या किंवा प्रशिक्षणा दरम्यान विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पोलिसांना आर्थिक स्वरुपात बक्षीस (incentive) दिले जावे. अशा प्रकारच्या योजना पोलिसांना अधिक चांगले काम करण्यास प्रवृत्त करतील.[27]

५) स्थानिक नसलेल्या पोलिसांसाठी चांगली प्रशस्त घरे बांधण्यात यावीत.

६) पोलिसांच्या तक्रारींसाठी एक केंद्र असणे आवश्यक आहे. पोलिसांची पारंपारिक अर्थाने युनियन नाही. साहजिकच आपल्या तक्रारी मांडण्याचे व्यासपीठ पोलिसांना मिळत नाही. त्यामुळे त्यांची अवस्था तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी होते.

पोलीस सुधारणेसाठी झालेले/ चालू असलेले प्रयत्न

विविध निवृत्त पोलीस अधिकारी, कार्यकर्ते यांनी पोलीस आणि सुरक्षा यंत्रणेच्या बाबतीत मुख्यतः पुढील आक्षेप नोंदवले आहेत-

१. पोलीस दलाच्या दैनंदिन कारभारात राजकीय हस्तक्षेप
२. उच्च पदांवर नेमणुका करताना कोणतेही नेमके निकष ठरवलेले नसणे.
३. वरिष्ठांच्या आणि पर्यायाने राजकीय नेत्यांच्या इच्छेखातर होणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या. किमान कार्यकाल निश्चित नसणे.
४. पोलीस दलात अन्वेषण(Investigation) आणि कायदा सुव्यवस्था कायम राखणे या दोन स्वतंत्र गोष्टींसाठी स्वतंत्र विभाग नसणे.
५. पोलीस दलातील नेमणुका, बदल्या, बढत्या यामध्ये सुसूत्रता आणि समन्वय नसणे.
६. पोलीस अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या विरोधातील तक्रारींसाठी स्वतंत्र प्राधिकरण.
७. राष्ट्रीय पातळीवर समन्वय नसणे

[27] http://directives.chicagopolice.org/directives-mobile/data/a7a57bf0-13bae8c0-08813-bae8-d9685503361e5330.html?ownapi=1

या आणि अशा आक्षेपांचे निराकरण केले जावे या उद्देशाने दोन निवृत्त पोलीस महासंचालकांनी १९९६ मध्ये सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली. सप्टेंबर २००६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने वरील सात मुद्द्यांबाबत निर्देश सर्व राज्य सरकारांना आणि केंद्र सरकारला दिले. व त्यांचे पालन करण्यास्तही जानेवारी २००७ ची मुदत दिली. पुढे कोर्टात राज्यांनी मुदतवाढ मागून घेतली. राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल याचिका कर्त्यांनी राज्यांच्या विरोधात अजून एक याचिका दाखल केली. खटला चालूच राहिला. याच दरम्यान सरन्यायाधीशांनी "एकही राज्य सहकार्य करत नाही, आम्ही काय करावे?" असे उद्गार काढले. अखेर नोव्हेंबर २०१० रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश न पाळल्याने महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, कर्नाटक आणि प.बंगाल यांच्या विरोधात नोटीसा काढल्या.

प्रत्यक्षात अद्यापही महाराष्ट्रात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन झालेले नाही.[28]

नक्षलवाद आणि दहशतवाद यांचे अंतर्गत सुरक्षा व्यवस्थेला धोके

नक्षलवाद-[29]

नक्षलवाद हे भारताच्या अंतर्गत सुरक्षेला सर्वात मोठे आव्हान असल्याचे पंप्रधान मनमोहनसिंग यांनी आपल्या बोलण्यात २०१० मध्ये सांगितले.[30] नक्षलवाद हा भारतातील खाणी आणि जंगले अशा प्रचंड नैसर्गिक साधनसंपत्तीने भरलेल्या प्रदेशात पसरला आहे. या भागातील या संपत्तीचा वापर करायचा तर स्थानिक आदिवासी लोक विस्थापित केले जातात. आणि या अन्यायाविरोधात आदिवासींनी सुरुवातीला नक्षली चळवळीला साथ दिली.

नक्षलवादाशी लढायचे तर केवळ पोलिसी बळावर लढून चालणार नाही. स्थानिकांना विश्वासात घ्यावे लागेल. सरकार आणि पोलीस त्यांच्या भल्यासाठी आहेत हा विश्वास निर्माण करावा लागेल. पोलिसांनी आदिवासी भागात नक्षलवाद्यांना पकडण्याच्या नावावर आजवर अनेकदा अत्याचार केले आहेत. अशा घटनांमुळे नक्षलवादात भरच पडत जाते आहे. राजकीय नेते आपल्या राजकीय फायद्यासाठी नक्षलवाद्यांचा वापर करतात हे उघड सत्य आहे.

[28] http://www.humanrightsinitiative.org/programs/aj/police/india/initiatives/seven_steps_to_police_reform.pdf

[29] नक्षलवादाचे आव्हान : देवेंद्र गावंडे, साधना प्रकाशन.

[30] http://www.indianexpress.com/news/naxalism-gravest-internal-security-threat-to-nation-pm/609303/

पोलिसांच्या पातळीवर पाहता नक्षलवादाशी मुकाबला करण्यासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. गनिमी काव्यासारख्या युद्धप्रकारात लढण्याचे प्रशिक्षण आपल्या पोलीस दलांना नाही. तशी शस्त्रे आणि उपकरणेही पोलीस दलाकडे नाहीत. या भागात काम करण्यासाठी प्रभावी गुप्तचर यंत्रणा असणे आवश्यक आहे. पण त्याचाही तिथे उपस्थित पोलिसांकडे अभाव आहे. नक्षलवाद हा एकाच राज्याचा प्रश्न नाही. महाराष्ट्र, छत्तीसगड, ओडिशा आणि आंध्र प्रदेश या पट्ट्यात असलेल्या जंगलात नक्षलवादी पसरले आहेत. आणि म्हणूनच या चारही राज्यांच्या पोलीस दलांत समन्वय असण्याची नितांत आवश्यकता आहे. चारही राज्यांनी एकत्रितपणे या प्रश्नावर कार्यवाही करणे गरजेचे आहे. माहितीची देवाण घेवाण, कारवाईमध्ये समन्वय आणि एकत्रित धोरण आखणी या गोष्टींची गरज आहे.

नक्षलवाद्यांचे आर्थिक मदत मिळवण्यासाठी आणि इतर सामाजिक पाठींबा मिळवण्यासाठी शहरी भागात गुप्तपणे अनेक कार्यकर्ते कार्यरत असल्याचे उघडकीस आले आहे. अशा काही कार्यकर्त्यांना शहरी भागातून पोलिसांनी अटक केली आहे.[31] गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट करून या नक्षलवादी गटांच्या कार्यकर्त्यांना रोखणे आवश्यक आहे.

नक्षलवादाचा प्रश्न हा केवळ पोलिसी बळाचा नसून अधिकाधिक पोलीस दल नक्षलग्रस्त भागात धाडल्याने सुटणारा नाही. यासाठी राजकीय आणि प्रशासकीय पातळीवरून प्रयत्न करावे लागतील.

दहशतवाद-

अंतर्गत सुरक्षेला दहशतवादाचा मोठा धोका आज आहे. पुण्यात गुप्तचर यंत्रणांनी धोक्याचा इशारा देऊनही जर्मन बेकारी येथे बॉम्बस्फोट झाला. यामागे सुरक्षा यंत्रणांची आणि शासनाची ढिसाळ यंत्रणा जबाबदार आहे.

जर्मन बेकारी स्फोटानंतर सुरक्षिततेच्या कारणास्तव लावायचे सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापही पुण्यात लागलेले नाहीत. लागलेले कॅमेरे काम करत नाहीत अशी परिस्थिती आहे. याबाबतीत पोलिसांनी पुढाकार घेऊन अंमलबजावणी करणे गरजेचे आहे.

[31] http://articles.timesofindia.indiatimes.com/2011-04-30/mumbai/29490480_1_golden-corridor-committee-naxal-literature-naxal-movement

काही अगदी मूलभूत असे सुरक्षा उपाय प्रभावीपणे राबवणे दहशतवादाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक आहेत. भाडेकरू म्हणून राहायला आलेल्या प्रत्येकाची सर्व माहिती पोलिसांना देणे नियमाने बंधनकारक आहे. पण त्याची अंमलबजावणी करायला हवी. यामुळे पोलिसांची शहरात येणाऱ्या जाणाऱ्या व्यक्तींवर नजर राहिल. त्याचबरोबर इतर राज्यातील पोलिसांबरोबर समन्वय साधत दिली गेलेली माहिती खरी आहे ना याची तपासणी व्हायला हवी. उदा. भाडेकरू म्हणून एखादी दिल्लीची व्यक्ती पुण्यात आली असेल तर पुणे पोलिसांनी दिल्ली पोलिसांशी संपर्क साधत सदर माहिती खरी असल्याची शहानिशा करून घ्यावी. याचा चांगलं परिणाम दहशतवाद विरोधी कामात दिसून येईल.

बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाकडे असलेली यंत्रे आणि इतर सामग्री ही अद्ययावत नाही. अधिक चांगल्या दर्जाची उपकरणे या पथकाकडे असणे आवश्यक झाले आहे. तसेच या पथकातील व्यक्तींची संख्याही वाढवायला हवी. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकास सातत्याने नवनवीन पद्धतीच्या स्फोटकांचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. दहशतवादी वेगवेगळ्या पद्धतीने बॉम्ब बनवतात जेणेकरून तो बॉम्ब फुटण्यापासून रोखता येणार नाही. अशा बॉम्ब्स मध्ये एक सर्किट बंद केले की दुसरे चालू होते. दुसरे बंद केले की तिसरे चालू होते. त्यामुळे बॉम्ब डिफ्युज करणे अशक्य होऊन बसते.[32]

दहशतवाद्यांना शहरातील नागरिकांकडूनच अनेकदा मदत होत असते. याकामी दंगलींमध्ये वगैरे होरपळलेल्या व्यक्तींना उपयोगात आणले जाते. हे टाळण्यासाठी आणि धार्मिक तेढ कमी करण्यासाठी भिवंडी मध्ये झालेल्या 'शांतता कमिटी' सारखे प्रयोग[33] इतरही शहरांत विशेषतः संवेदनशील भागात व्हायला हवेत.

---

[32] बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे माजी प्रमुख श्री. जगदाळे यांनी सांगितल्यानुसार. पुण्यात जंगली महाराज रस्त्यावर ७ बॉम्ब स्फोट झाले होते. मात्र ते नीट फुटलेच नाही याचे कारण ते नीट बनवण्यात आले नव्हते. वेगवेगळे प्रयोग करून बॉम्ब बनवण्याच्या प्रयत्नांत दहशतवादी असल्याने असे काही प्रयोग फसतात. २०११ मध्ये बंगलोर मधेही असाच एक स्फोटाचा प्रयत्न फसला होता असे जगदाळे यांनी सांगितले.

[33] परिशिष्ट- भिवंडीतील शांतता कमिट्य

अंतर्गत सुरक्षा आणि इतर सामाजिक-राजकीय प्रश्न यांचा संबंध

अंतर्गत सुरक्षितता सांभाळणे, शांतता राखणे आणि नागरिकांना निर्भयपणे वावरता यावे असे वातावरण निर्माण करणे हे पोलीस दलाचे मुख्य काम आहे. त्यासाठी आवश्यक अशा गोष्टी या दलास कराव्या लागतात. यामध्ये गुन्ह्यांचा तपास करणे, गुन्हेगारांना रोखणे, वैयक्तिक अथवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान रोखणे अशा कामांचा समावेश होतो.

परंतु मुळात गुन्हेच का घडतात याचाही अंतर्गत सुरक्षेचा अभ्यास करताना शोध घेणे आवश्यक आहे. कारण पोलीस दलाचा आकार वाढवून आणि त्यावर भारंभार खर्च करूनही अपेक्षित लक्ष्य साध्य करता येणार नाही जोवर गुन्हे घडतात का या प्रश्नाच्या मुळाशी आपण जाणार नाही.

गुन्हे का घडतात याची ढोबळमानाने पुढील कारणे मांडता येतील –

बेरोजगारी

गुन्हेगारी का वाढते याचे सर्वात मुख्य कारण मांडले जाते ते म्हणजे बेरोजगारी. कायदेशीर मार्गाने रोजगार मिळून पोट भरण्याची सोय नसल्याने मुख्यत्वे तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारीकडे वळतो. बेरोजगारी वाढण्यामागे उद्योग धंद्यांबाबतचे सरकारचे धोरण आणि एकूणच देशाची आर्थिक धोरणे याव्यतिरिक्त तीन मुख्य कारणे सांगता येतील- एक म्हणजे रोजगारासाठी शिक्षणाचा अभाव. दुसरे म्हणजे अपेक्षेइतके वेतन न मिळणे आणि तिसरे म्हणजे श्रमाला प्रतिष्ठा नसणे.

उपलब्ध जागांच्या भरतीसाठी आवश्यक असे कुशल मनुष्यबळ कमी असल्याने अकुशल मनुष्यबळ रोजगारापासून दूर राहते. तंत्रशिक्षणापासून दूर असणारा ग्रामीण वर्ग यामध्ये मोठ्या प्रमाणात मोडतो. मोठे उद्योगधंदे, वेगाने विकसित होणारे सेवाक्षेत्र यासाठी नवीन तंत्रज्ञान अवगत असणारे कुशल मनुष्यबळ लागते. साहजिकच उच्च आणि तंत्रशिक्षणाच्या अभावामुळे बेरोजगारी वाढते.

अनेकदा शिक्षणावर आणि शहरातील राहण्यावर होणारा खर्च पाहता रोजगार उपलब्ध झाला तरी मिळणारे वेतन अत्यल्प असल्याची तक्रार दिसून येते. त्यामुळे काम जास्त आणि

उत्पन्न मात्र कमी असे चित्र असल्यास कमी काम करून अधिक उत्पन्न देणाऱ्या गुन्हेगारीकडे तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात वळतो.

विशिष्ट कामाला प्रतिष्ठा नसल्याने पात्रता असूनही आणि पुरेसे वेतन मिळत असूनही ते काम करण्यासाठी अनेकजण तयार होत नाहीत. यामुळे बेरोजगारीत भरच पडते.[34] त्यामुळे हॉटेल्स मध्ये, वेगवेगळ्या दुकानांत, सुतारकाम-प्लंबिंग अशा दुकानांत स्थानिक लोक रोजगार न घेता बेरोजगार राहणे पसंत करतात. यामुळेही एकूण बेरोजगारी वाढते.

आर्थिक दरी

भारताचा विकासदर आणि एकूण उत्पन्न वेगाने वाढत असले तरी त्याचे वितरण समान प्रमाणात होत नाही. काही मूठभर श्रीमंतांकडे संपत्ती साठत जाते. आणि गरीब अधिक गरीब होत जातो. या वाढत्या आर्थिक दरीमुळे गुन्हेगारी वाढते. झटपट श्रीमंत होण्याचा मार्ग म्हणून गुन्हेगारीकडे बघितले जाते. वाढत्या आर्थिक दारीबरोबर खंडणीखोरी, अपहरण, दरोडे अशा गुन्ह्यांची वाढ दिसून येते.

स्थलांतर

ग्रामीण भागातून शहरांकडे, छोट्या शहरांतून मोठ्या शहरांकडे होणारे स्थलांतर हा गुन्हेगारीमध्ये भर घालणारा प्रश्न आहे. रोजगाराच्या निमित्ताने जो अशिक्षित तरुण वर्ग स्थलांतर करतो तो उत्पन्नाचे साधन म्हणून गुन्हेगारीकडे बघतो. याशिवाय एक महत्वाची गोष्ट बघण्यात येते ती म्हणजे स्थलांतरित लोकसंख्येमध्ये स्थलांतर होऊन आलेल्या शहराबद्दल वा प्रांताबद्दल आत्मीयता वाटत नाही. त्यामुळे अशी लोकसंख्या संघटीत गुन्हेगारी क्षेत्रात झटपट ओढली जाते.

मानसिक अस्वास्थ्य

हिंसाचाराच्या घटनांत गेल्या काही वर्षात वाढ झाली आहे.

---

[34] सुतारकाम, प्लंबिंग अशी कामे करणाऱ्या कंत्राटदार लोकांशी चर्चा केली असता, त्यांनी अनेक जण ही कामे करण्यात कमीपणा मानतात आणि त्यामुळे काम करायला नकार देतात असे सांगितले. याचा परिणाम म्हणजे परप्रांतीय लोक हीच कामे पटापट हस्तगत करतात आणि स्थानिक माणूस मात्र बेरोजगारच राहतो.

देशातील गुन्ह्यांची काही आकडेवारी पुढीलप्रमाणे-

गुन्हे	२०१०	२०११
हिंसाचार	२,४१,९८६	२,५८,३२९

यामागे अनेक कारणांपैकी एक कारण आहे ते म्हणजे समाजात मानसिक स्वास्थ्य नसणे. वेगवेगळ्या घटनांचा परिणाम मानवी मनावर होत असतो. यामध्ये दैनंदिन जीवनातली स्पर्धा, नागरी सोयी सुविधा न मिळणे, दहशतवाद-चोऱ्या यासारख्या घटनांतून असुरक्षिततेची भावना वाढणे, महागाई-भ्रष्टाचार यांसारखे सामाजिक प्रश्न या सगळ्याचा एकत्रित परिणाम मानसिक स्वास्थ्य गमावण्यावर होऊ शकतो. अशावेळी अनेक व्यक्ती अधिक हिंसक आणि आक्रमक बनतात. क्षुल्लक कारणावरून वादविवाद होऊन मारामारीपासून खुनापर्यंत गोष्टी घडतात.[35]

मानसिक स्वास्थ्य आणि सामाजिक नैतिकता याविषयी काम करणे आवश्यक आहे. कोलंबिया देशाच्या बोगोटा शहराच्या महापौराने विविध प्रयोग करत हिंसाचाराच्या घटना निम्म्याने कमी केल्या.[36]

कायद्याचा धाक नसणे

एखाद्या गुन्ह्याचा तपास लागणे, गुन्हेगारांना पकडले गेल्यावर त्यांना शिक्षा होणे या प्रक्रियेमध्ये प्रचंड वेळ जातो. शिवाय ज्या प्रमाणात गुन्ह्यांची संख्या वाढत जात आहे त्याप्रमाणात त्यावरील अंमलबजावणी होण्याच्या घटनांची संख्या वाढत नसल्याने कायद्याचा धाक कमी होतो.

अशा परिस्थितीत गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिल आणि गुन्हेगारी कमी होईल अशी आशा बाळगता येणार नाही. पोलीस दलात कितीही सुधारणा केली तरी या गोष्टींमध्ये सुधारणा झाल्याशिवाय गुन्हेगारी आणि अंतर्गत सुरक्षितता या बाबतीत निर्णायक बदल घडणे अवघड आहे.

---

[35] समुपदेशक प्रफुल्ला मोहिते यांच्याशी झालेल्या चर्चेतून.

[36] परिशिष्ट (२)

परिशिष्ट (१)- भिवंडीतल्या मोहल्ला समित्या

भिवंडी हा हिंदू-मुस्लीम दंग्यांच्या दृष्टीने संवेदनशील भाग. पण इथे सुरेश खोपडे यांची पोलीस आयुक्त म्हणून नेमणूक झाली तेव्हा त्यांनी केलेल्या अभिनव प्रयोगांमुळे या भागात एकदम विश्वासाचे वातावरण निर्माण झाले. बाबरी मशीद पडल्यावर भारतात विविध भागात दंगली झाल्या. मुंबईत सुद्धा दंगली झाल्या. पण नेहमी दंगल होणाऱ्या अतिशय संवेदनशील अशा भिवंडीत मात्र दंगल झाली नाही. त्या संपूर्ण कालखंडात भिवंडी पूर्णपणे शांत होती. अनुभवाबाबत सुरेश खोपडे यांनी 'मुंबई जळाली, भिवंडी का नाही?' हे पुस्तक लिहिले आहे.

मोहल्ला/शांतता समित्या-

भिवंडीतल्या प्रयोगामधला सर्वात महत्वाचा भाग म्हणजे इथे तयार करण्यात आलेल्या शांतता समित्या. शांतता समित्या या शहराच्या वेगवेगळ्या भागातल्या प्रत्येक मोहल्ल्यात बनवण्यात आल्या होत्या. त्या त्या भागातील वयाने आणि मानाने ज्येष्ठ असणाऱ्या नागरिकांच्या या समित्या होत्या. तरुणांना विशेष स्थान देण्यात आलं होतं. यामध्ये हिंदू-मुस्लीम नागरिकांची समसमान संख्या होती. मुख्यतः अफवा, गैरसमजुती, वाद याबाबत जागरूक राहणे हे या समित्यांचे मुख्य काम होते.

धार्मिक वादांच्या जागी या समित्यांनी जागच्या जागी समजुतीने वाद सोडवण्याचे काम केले. नागरिकांच्या सहभागाने मोहल्ल्याला आदर असलेल्या व्यक्तीच या समित्यांवर सर्वसाधारणपणे असल्याने नागरिकांतर्फे या समित्यांना महत्व दिले गेले. दुसरे अत्यंत महत्वाचे काम या समित्यांनी केले ते म्हणजे अफवांवर बारीक लक्ष ठेवले. अफवा पसरवणाऱ्या लोकांची माहिती ताबडतोब पोलिसांना कळवली. काही वेळा अशा व्यक्ती राजकीय पक्षांशी संबंधित असल्याचे कळूनही पोलिसांनी कडक पावले उचलली आणि अफवांचा बंदोबस्त केला. या समित्यांच्या अस्तित्वामुळे मोहल्ल्यावर करडी नजर राहिली. पेट्रोल, तलवारी अशा गोष्टींचा साठा

कोणी केल्याचे लक्षात आल्यावर तत्काळ कारवाई केली गेली. या समित्या म्हणजे पोलिसांचे डोळे बनल्या. त्यामुळे अपुरे मनुष्यबळ असूनही पोलिसांनी शांतता राखण्यात यश मिळवले.

पोलीस नागरिक बैठका-

आयुक्त म्हणून रुजू झाल्यावर सुरेश खोपडे यांनी सुरु केलेली अगदी पहिली गोष्ट म्हणजे पोलीस-नागरिक बैठका. महिन्यातून एकदा या बैठका होत असत. नागरिकांना पोलीस जवळचे वाटावेत, आपले वाटावेत म्हणून या बैठकांचा उपयोग झाला. त्याचबरोबर या बैठकांमध्ये महिन्याभरात घडलेले गुन्हे, त्याचा पोलिसांतर्फे झालेला तपास, नागरिकांनी घ्यायची काळजी या विषयांवर पोलीस माहिती देत. प्रत्येक पोलीस आणि अधिकारी यांची नागरिकांशी समक्ष भेट होत असल्याने विश्वासाचे नाते तयार झाले. नागरिक पोलीस स्टेशनमध्ये येण्यास घाबरत असत. ते बंद झाले.

पोलीस नागरिक बैठकांमुळे मोहल्ला समित्यांचे सदस्य पोलिसांचे हस्तक असल्याची नकारात्मक भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली नाही. त्यामुळे मोहल्ला समित्यांचे काम अधिक प्रभावी होऊ शकले.

भिवंडी म्हणजे नागरिकांच्या कृतीशील सहभागामुळे कायदा सुव्यवस्था राखण्याचा अभिनव प्रयोग असे म्हणता येईल. याचा चांगला परिणाम अनेक बाबतीत दिसून आला. लोक अधिक जागरूकपणे संघटीत झाले. सुरक्षितता, गुन्हेगारी याबरोबरच नागरी सोयी सुविधांबाबतसुद्धा बोलू लागले. भिवंडीत अजूनही एकदाही दंगल झालेली नाही हे या प्रयोगाचे यश आहे.

परिशिष्ट (२)- बोगोटा

कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने १९९४ मध्ये बोगोटा या कोलंबियातील शहराची अवस्था अतिशय वाईट होती. हिंसाचार प्रचंड वाढला होता. एकूणच सुरक्षा व्यवस्था कोसळली होती. अशा परिस्थितीत महापौर झालेल्या अंताना मॉर्कस याने आपल्या अभिनव तंत्राने बदल घडवून दाखवला आणि अख्ख्या जगाला चकित करून सोडले.

बोगोटा शहरातील परिस्थिती खूपच बिघडली होती. अंताना मॉर्कस ज्यावेळी महापौर झाला त्यावेळी दर एक लाख लोकसंख्येमागे दर वर्षी तब्बल ७० लोक अनैसर्गिकपणे मृत्यू पावायचे. बोगोटाची त्यावेळी लोकसंख्या होती ८० लाख. याचा अर्थ तब्बल ५६०० लोक प्रतिवर्षी अपघात किंवा हिंसाचाराला बळी पडायचे. ही परिस्थिती नक्कीच गंभीर होती.

माणसाच्या जीवाला सर्वात जास्त महत्व दिले पाहिजे. कारण जीव गेला तर होणारे नुकसान कधीच न भरून येणारे आहे अशी घोषणा कारण अंताना मॉर्कस याने हिंसाचाराविरुद्ध जोरदार मोहीम उघडली. शहरातील नागरिकांना शांततेने राहण्याचे आणि अहिंसेने वागण्याचे शिक्षण द्यायचे असे त्याने ठरवले. यासाठी विविध भन्नाट प्रयोग त्याने केले. यातले बरेचसे प्रयोग अतिशय प्रतीकात्मक होते. पण त्याचा मोठा परिणाम नागरिकांवर झाला.

<u>अहिंसेचे लसीकरण-</u> ही प्रतीकात्मक मोहीम अंताना मॉर्कस यानेच लस म्हणून पोलिओचे असतात तसले साधे पाण्याचे थेंब घेतले आणि आता मी लस घेतलेली असल्याने हिंसा करणार नाही असे म्हणले. ही मोहीम शाळाशाळांमध्ये राबवण्यात आली. एखादी राष्ट्रीय आरोग्यविषयक मोहीम असावी त्यापद्धतीने हे करण्यात आले. यावर प्रसार माध्यमांनी विरोधकांनी भरपूर टीका केली, खिल्ली उडवली. पण लोकांची मानसिकता बदलायची असेल तर अशा गोष्टी कराव्या लागतील यावर अंताना मॉर्कस ठाम राहिला.

<u>घरात सुद्धा अहिंसा-</u> हिंसेची सुरुवात घरापासून होते कारण मूल अगदी लहान असल्यापासून घरात हिंसा बघत असते. आणि म्हणून यामध्ये बदल करण्याचे महापौर अंताना मॉर्कस याने ठरवले. त्याने लहान मुलांसाठी मदत केंद्रे उभारली. लहान मुलांना शिक्षा म्हणून फटके देण्यावर बंधने घातली. लहान मुलांवर अहिंसेचे आणि शांततेने प्रश्न सोडवण्याचे मूल्य शिक्षणातून बिंबवले गेले.

गुन्हे कमी करण्यासाठी अशा चौफेर केलेल्या प्रयत्नांना अंताना मॉर्कसच्या प्रशासकीय धोरणांचीही साथ मिळाली. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे अनैसर्गिकपणे मृत्यू होणाऱ्यांची संख्या तब्बल ५० टक्क्यांनी कमी झाली. गुन्हेगारी कमी झाली. लोकांना शहरात सुरक्षित वाटू लागले. आणि मोठ्या प्रमाणात व्यापार उदीम वाढला ज्याचा थेट चांगला परिणाम शहराच्या अर्थकारणावर झाला.

गुन्हेगारी ही फक्त पोलीसदल वाढवून किंवा शस्त्राची मदत घेऊन कमी करता येईल या पारंपारिक गृहितकाला अंताना मॉर्कसने छेद दिला. त्याच्या जगावेगळ्या कल्पनांनी आणि योजनांनी, प्रतीकात्मक मोहिमांनी नागरिकांमध्ये नैतिकता रुजवण्याचा प्रयत्न केला. आणि याचाच दृश्य परिणाम म्हणजे ५० टक्क्यांनी घटलेली गुन्हेगारी.